नि.फौ.ख.क्र. ५३४/२०२१
सरकार वि. श्रध्दा
**निशाणी क्र. ३०**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ४ यांची शपथेवर सरतपासणी सुरू**

| मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, | | |
|---|---|---|
| नाव | – | अभिषेक सोहन तोमस्कर |
| वय | – | ३५ वर्षे |
| धंदा | – | खाजगी |
| राहणार | – | मानेवाडा–बेसा रोड, नागपूर |

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती संगीता गोगे यांच्याकडून**

सन २०२० मध्ये मी मेडीकल रोडने दुचाकीने जात असतांना एका मुलीने माझ्याकडे लिफ्ट मागितली म्हणुन मी तिला गाडीवर बसवले. ती तिचा भाउ कॅन्सर रोगामुळे ॲडमीट आहे असे सांगुन रडु लागली. तिने तिला आई–वडिल नाहीत व तिला पैशाची गरज असल्याचे सांगुन मदत मागितली. तिने पैशाच्या बदल्यात तिच्याकडील आईचे मंगळसुत्र देते असे सांगितले. आठवडयाभरात पैसे परत देवून मंगळसुत्र परत घेवून जाते असे तिने सांगितले. मी तिच्याकडुन मंगळसुत्र घेवून तिला रुपये २०,०००/– दिले. काही दिवसांनी नंदनवन पोलीस स्टेशनमधुन मला मंगळसुत्र चोरीचे असल्याचा फोन आला. मी पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी माझ्याकडुन मंगळसुत्र घेतले. ती मुलगी या प्रकरणात आरोपी आहे. तिला मी ओळखू शकतो.

**उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री. एस. एम. माटे यांच्यामार्फत**

२. कोणत्या पोलीसाने मला फोन केला होता त्याचे नाव मी सांगु शकत नाही. फोन आल्याची तारीख मला सांगता येणार नाही. पोलीसांनी माझे बयाण ऑक्टोबर २०२० मध्ये घेतले. बयाण ज्याने घेतले त्याचे नाव मला सांगता येणार नाही. बयाणामध्ये मी आरोपीचे वर्णन सांगितले नव्हते. आरोपीकडे मी तिच्या भावाच्या रोगाबाबत कागदपत्रे पाहिले नाहीत. मंगळसुत्र माझ्याकडुन घेतल्यानंतर पोलीसांनी एका को–या कागदावर माझी सही घेतली होती. पोलीसांनी कोणते कागदपत्र तयार केले त्याची मला माहिती नाही. पोलीसांना मंगळसुत्र दिल्यानंतर मी त्यांच्याकडुन

काही कागदपत्र घेतले नाही. मी सांगतो तशी कोणतीही घटना घडलेली नाही, हे म्हणणे खरे नाही. मी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

फेरतपास – नाही

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष,

(श्री. यु.पी. कुलकर्णी)
मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर

दिनांकः– २२.०१.२०२५